दैनिक

● छ.संभाजीनगर, बीड, जालना, नांदेड, परभणी, धाराशिव, लातूर ●

# मराठवाडा पत्र

बुधवार
५.२.२०२५
वर्षे : ४ अंक : २९९
किंमत : ३ रू. पाने : ४

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955 पान -१











# ‘मधुबनी’में लोकशाही...




पूर्वसुरींच्या अनुभवसिद्ध नेणतेपणाची यथेच्छ चेष्टा करत स्वत:च्या असिद्ध कर्तृत्वाचे ढोल बडवणारे प्रस्थापित झाले की पूर्वसुरींच्या मार्गानेच जाण्याची वेळ कशी येते याची उदाहरणे अनेक. नुकताच सादर झालेला अर्थसंकल्प हे यातील एक नवे. अणुऊर्जा क्षेत्रात खासगी गुंतवणुकीस आणि विमा क्षेत्रात १०० टक्के परदेशी गुंतवणुकीस मुभा देण्याचा निर्णय या अर्थसंकल्पात आहे. त्याचे स्वागत करताना या निर्णयाचा समर्पक अन्वयार्थ लावणे आवश्यक. कारण अमेरिकेशी मनमोहनसिंग यांनी केलेल्या अणुकराराची संभावना भाजपने त्या देशापुढे ‘शरणागती’, ‘अमेरिकेचे मांडलिकत्व’ आदी शेलक्या विशेषणांनी केली आणि ते ‘मांडलिकत्व’, ‘शरणागती’ टाळण्यासाठी अणुऊर्जा कंपन्यांवरील निर्बंधांचा हट्ट धरला. तथापि ताज्या अर्थसंकल्पात तो हट्ट सोडण्याची तयारी दाखवण्याची वेळ त्याच भाजपवर आली असून ही माघार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे लवकरच वॉशिंग्टनी डोनाल्ड ट्रम्प दरबारी सादर होणे याचा काहीही संबंध नाही असे मानणे शतमूर्खपणाचे ठरेल. भारतीय उत्पादनांवर अधिक जकातीची कुऱ्हाड टाळावयाची असेल तर भारतास अधिकाधिक खरेदी अमेरिकी कंपन्यांकडून करावी लागेल, असा स्पष्ट इशारा ट्रम्प यांनी दिल्यानंतर आलेले हे शहाणपण. जी बाब कोणत्याही धमकीशिवाय मनमोहनसिंग सन्मानपूर्वक करू पाहात होते ती आता आपणास अमेरिकी दडपणाखाली मान खाली घालून स्वीकारावी लागणार. तीच बाब विमा क्षेत्रात १०० टक्के परदेशी गुंतवणूक करू देण्याबाबत. आज जगातील पहिल्या पाच विमा कंपन्यांत दोन अमेरिकी, दोन चिनी आणि एक जर्मन कंपनी आहे. या कंपन्यांस आता भारतीय बाजार खुला होईल. हे सर्व पाहून एन्रॉन समुद्रात बुडवण्याची भाषा करणाऱ्यांनाच त्याचे कसे पुनर्वसन करावे लागले त्याचे, ‘आधार’ला विरोध करणाऱ्यांनी ‘आधार’सक्ती केली त्याचे, वा ‘जीएसटी’ नको म्हणणाऱ्यांनीच तो कसा गोड मानून घेतला इत्यादी सर्वांचे वा यातील काहींचे स्मरण झाल्यास आश्चर्य नाही. असो. उशीर झाला म्हणून शहाणपणाचे महत्त्व काही कमी होत नाही. या अर्थसंकल्पी निर्णयांचे स्वागत. तथापि यातून देश म्हणून आपली धोरण-धरसोड तितकी दिसते आणि त्याचमुळे भारताबाबत परदेशी कंपन्या आणि गुंतवणूकदार अधिक सावधगिरी का बाळगतात, हेही समजून घेता येते. ही आपल्याबाबतची सावधगिरीची भावना कमी होण्यास हा अर्थसंकल्प उपयोगी ठरतो, असे ठामपणे म्हणता येत नाही. याचे कारण दीर्घकालीन धोरणांपेक्षा तत्कालिक राजकीय लाभाचाच विचार अलीकडे आपल्या अर्थसंकल्पातून समोर येतो. ताजा अर्थसंकल्प त्यास अपवाद नाही. एकदा कारखानदारांवर सवलतींचा वर्षाव करायचा, त्यांचे गोडवे गायचे, श्रेय घ्यायचे आणि त्याचा जमिनीवरील परिस्थिती बदलण्यात काहीही फायदा झालेला नाही हे लक्षात आल्यावर त्यांच्याकडे दुर्लक्ष करायचे आणि सवलतींसाठी नवे गिऱ्हाईक शोधायचे; असा हा खाक्या. यावेळचे हे नवे गिऱ्हाईक अर्थातच मध्यमवर्ग. पण पंचाईत अशी की या वर्गास हवे ते देता यावे यासाठी आवश्यक ती श्रीशिल्लक नाही हे लक्षात आल्याने पुन्हा कात्री लावली गेली ती दीर्घकालीन धोरणालाच. भांडवली खर्चाबाबत (कॅपेक्स) घेण्यात आलेला सार्वत्रिक आखडता हात हे याचे उदाहरण. यंदा ३१ मार्च रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षासाठी भांडवली खर्चाची तरतूद होती ११.१ लाख कोटी रुपयांची. अर्थसंकल्पानुसार हा प्रत्यक्ष खर्च होईल १०.८ लाख कोटी रु. इतका. म्हणजे अपेक्षेपेक्षा कमी. असे असताना आगामी वर्षासाठी सरकार ११.२ लाख कोटी रु. इतकाच खर्च विविध पायाभूत सोयीसुविधा निर्मितीसाठी करणार असे अर्थसंकल्प म्हणतो. म्हणजे ‘विकसित भारता’साठी शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान आदीवर खर्च करायला सरकारहाती अधिक पैसाच नाही. कारण मध्यमवर्गीयांस खूश करण्यासाठी प्राप्तिकरात सवलती दिल्याने एक लाखांहून अधिक कोटी रुपयांचा खड्डा पडणार. तो अन्य मार्गांनी बुजवायचा तर वित्तीय तूट वाढणार. आताच ती ४.८ टक्क्यांवर राखली गेली आहे. म्हणजे पाच टक्क्यांची मर्यादा आपण कशीबशी पाळणार. ती नाही पाळली तर आंतरराष्ट्रीय मानांकनातील घसरगुंडीपासून कर्ज उभारणी महाग होणार. हे सर्व न परवडणारे. त्यापेक्षा महत्त्वाच्या कामांसाठी हात आखडता घेणे अधिक सोपे. हाच सोपा मार्ग केंद्र सरकारने रेल्वेबाबतही स्वीकारला असल्याचे अर्थसंकल्पावरून दिसते. रेल्वेसाठी आगामी वर्षात अर्थसंकल्पात २.६५ लाख कोटी रुपयांची तरतूद आहे. यातील धक्कादायक बाब अशी की या भांडवली खर्च रकमेत गेल्या दोन वर्षांत केंद्राने एक रुपयाचीही वाढ केलेली नाही. या रकमेची विभागणी बघा. यातील २.५२ लाख कोटी रु. सरकारी साहाय्यासह एकूण महसुलाद्वारे तर १० हजार कोटी रु. अर्थसंकल्पेतर साहाय्य, तीन हजार कोटी रु. ‘अंतर्गत’ महसूल निर्मिती आणि २०० कोटी रु. निर्भया निधी याद्वारे मिळतील. अशी ही विभागणी. ‘निर्भया निधी’ रेल्वेचा महत्त्वाचा महसुलाधार असावा? एका बाजूने धडाधड ‘वंदे भारत’ वा तत्सम रेल्वेगाड्यांच्या घोषणा आणि त्याचवेळी ‘जनरल’ प्रवाशांचा रेल्वेप्रवास सुखाचा नव्हे तरी निदान सुसह्य व्हावा यासाठी अधिक तरतूद शून्य, असे हे वास्तव. एकेकाळी रामभाऊ नाईक, मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर असे काही सत्त्व असलेले नेते रेल्वेसाठी केल्या जाणाऱ्या तरतुदींबाबत कमालीचे जागरूक असत आणि त्यात कपर्दिक जरी कमी झाली तरी आवाज उठवत. तो काळ गेला. आज सामान्य रेल्वे प्रवाशांचे हाल कुत्राही खात नाही, अशी स्थिती. त्यामुळे रेल्वेसाठी एक रुपयाचीही अधिक तरतूद न केली जाणे याची ‘बातमी’देखील होत नाही. रेल्वेचा कल्याणकारी विचार करणारे शेवटचे रेल्वेमंत्री सुरेश प्रभू. त्यांनी स्वहस्ते रेल्वे संकल्प २०१६ साली मुख्य अर्थसंकल्पात विलीन केला आणि पुढे भाजपने त्यांचे अस्तित्वच विलीन करून टाकले. ‘बुलेट ट्रेन’चा हट्ट गोड मानून घेण्याचे चातुर्य अंगी नसल्याने प्रभू यांचे असे झाले असे म्हणतात. असो. पण जे झाले त्यामुळे गेल्या नऊ वर्षांत रेल्वेबाबत एकही मोठी दखल घ्यावी अशी घटना अर्थसंकल्पात घडलेली नाही, याचीही दखल घेणे आवश्यक ठरते. तेव्हा एखादा वर्ग जिंकणे/जोडणे हेच वा इतकेच अर्थसंकल्पाचे उद्दिष्ट ठेवले की काय होते हे यातून दिसते. आधी उद्योगपतींस जिंकण्याचा प्रयत्न झाला. आता मध्यमवर्गास. वास्तविक हे दोन्हीही वर्ग असे आहेत की सरकारने जिंकण्याचा वा जोडून घेण्याचा यत्किंचितही प्रयत्न केला नाही तरी राजीखुशीने ते आपली सेवा (विद्यामान) सत्ताचरणी सादर करतील. तरीही त्यांच्या लांगुलचालनाचा प्रयत्न करण्याची गरज सत्ताधीशांस वाटत असेल ती केवळ धोरण अपयशाची कबुलीच ठरते. एकदा या राज्यांस चुचकार, मग त्या राज्यांस, एकदा हा वर्ग, मग तो; या पलीकडे दहा वर्षांनंतरही अर्थसंकल्प जाण्यास काही तयार नाही, हे दुर्दैवी. यंदाचे वर्ष बिहारचे. कारण होऊ घातलेल्या निवडणुका. त्यामुळे अर्थमंत्रीणबाईंनी नेसलेली साडीही खास मधुबनी बिहारी. या असल्या बालिश प्रतीकात्मकतेमुळे आपली लोकशाहीही ‘मधुबनी’में नाचणाऱ्या राधिकेसारखीच बावरलेली राहणार.

## अंजली दमानिया यांच्या विरोधात अब्रू नुकसानीचा फौजदारी खटला
# मुंबई उच्च न्यायालयात दाखल करणार-धनंजय मुंडे



मुंबई, (वृत्तसेवा):-अंजली दमानिया यांनी आज दिवसभरात दुसऱ्यांदा पत्रकार परिषद घेत पुन्हा एकदा खोटे व बेछूट आरोप केले आहेत. या विषयासह विविध विषयांवर मोघम आरोप करणाऱ्या अंजली दमानिया ताई यांच्या विरोधात आपण आता फौजदारी अब्रू नुकसानीचा खटला मुंबई उच्च न्यायालयात दाखल करणार असल्याचे धनंजय मुंडे यांनी आता ट्विट केले आहे. अंजली दमानिया यांनी सकाळी एक पत्रकार परिषद घेत कृषी विभागाने मार्च २०२४ मध्ये राबवलेल्या विविध खरेदी बाबत अर्धवट माहितीच्या आधारे व एका वेबसाईटवरील भावांचे संदर्भ देत काही वस्तूंची चुकीच्या पद्धतीने खरेदी झाल्याचे आरोप करत कोट्यावधींचा घोटाळा झाल्याचा दावा केला होता. तसेच सदरील खरेदी प्रक्रिया ही चुकीच्या पद्धतीने राबवण्यात आल्याचेही त्या म्हणाल्या होत्या. यावर तत्कालीन कृषी मंत्री व सध्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी ताबडतोब पत्रकार परिषद घेत सविस्तर खुलासा सादर केला तसेच संपूर्ण प्रक्रिया ही खरेदी प्रक्रियेच्या नियमातील तरतुदीनुसार तसेच राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री वित्त यांच्या मान्यतेनुसारच झाली होती असे स्पष्ट केले होते. त्याचबरोबर अंजली दमानिया यांनी केलेल्या दाव्यांमध्ये कोणतेही तथ्य नसून, नॅनो खते देणाऱ्या इफको कंपनीकडून भारतात सर्वत्र एकाच दराने ही खते विकली जातात. मोठ्या प्रमाणात खरेदी असल्याने तरीसुद्धा संबंधित कंपनीकडे जवळपास आठ रुपये प्रति लिटर इतका दर कमी करण्यात आला होता तसेच हा दर देशात सर्वात कमी महाराष्ट्रात होता ही वस्तुस्थिती आहे. त्याचबरोबर ने स्प्रे पंप खरेदी, कापूस भरणा बॅग खरेदी तसेच गोगलगाईंचा प्रादुर्भाव नष्ट करणाऱ्या मेटलडीहाईड या रसायन्याची खरेदी सुद्धा प्रमाणित शासकीय दराप्रमाणे तसेच अतिशय पारदर्शक पद्धतीने टेंडर प्रक्रिया राबवूनच करण्यात आले होते हे धनंजय मुंडे यांनी स्पष्ट केले. त्यामुळे यात कोणत्याही प्रकारचा आर्थिक गैरव्यवहार झालेला नसल्याचे स्पष्ट होते. अंजली दमानिया बिनबुडाचे व खोटे आरोप करून सनसनाटी निर्माण करतात आणि मीडियावर प्रसिद्धी मिळवून आपले हेतू साध्य करून घेतात असा धनंजय मुंडे यांनी केलेला आरोप अंजली दमानिया यांच्या चांगलाच जिव्हारी लागलेला दिसत असून आता अंजली दमानिया या विचलित झाल्या असून पुन्हा एकदा माध्यमांच्या समोर आल्या व बेछूट आणि बिनबुडाचे आरोप करत सुटल्याचे दिसून आले. मागील ५८ दिवसांपासून कुठल्याही तपास प्रक्रियेवर काही प्रभाव पडू नये म्हणून शांत व संयमाने राहिलेले धनंजय मुंडे यांनी मात्र आता अंजली दमानी यांच्या खोट्या आरोपांवर मौन सोडले आहे. तर अंजली दमानिया यांच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयात फौजदारी अब्रू नुकसानीचा खटला (लीळाळपरश्र वळषषशीीरींळेप लरीश) दाखल करणार असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

# ‘बीडमधील दादागिरी ते मामींची जमीन’
## अंजली दमानियांनी सगळंच काढलं

मुंबई, (वृत्तसेवा):-बीड जिल्ह्यातल्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून हत्या करण्यात आली, या घटनेनंतर राज्यातील वातावरण चांगलंच तापलं आहे. आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. या प्रकरणात सुरुवातीपासूनच ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे, त्यांच्याकडून सातत्यानं मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. अंजली दमानिया यांच्याकडून सातत्यानं सुरू असलेल्या आरोपांनंतर आज धनंजय मुंडे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना दमानिया यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. त्यांनी दमानिया यांचा उल्लेख ‘बदनामिया’ असा केला, त्यानंतर आता दमानिया यांनी पत्रकार परिषद घेऊन धनंजय मुंडे यांना प्रत्युत्तर दिलं आहे. त्यांनी पीसी घेतली. मला वाटेल ती नावे ठेवली. दमानिया नाही तर बदनामीया नावं ठेवलं. पुराविया ठेवलं असतं तर चाललं असतं. बदनाम लोकांचे मी पुरावे देते, त्यामुळे माझं कोणतंही नाव ठेवलं तरी मला चालेल. मी एक-एक पुरावे काढून तुमची जागा दाखवणार आहे. तुम्ही जेवढा वेळ कराड सोबत होता, त्यापेक्षा एक क्षण तुम्ही मंत्री म्हणून बसला असता तर तुमच्यावर पीसी घ्यायची वेळ आली नसती. मला अधिकार होता असं मुंडे म्हणतात. १२ एप्रिल २०१८चा जीआर आहे. नवीन वस्तूंचा समावेश करण्याचा अधिकार मुख्यमंत्र्यांना देण्यात आला आहे. वस्तू वगळण्याचा अधिकार मुख्यमंत्र्यांना दिलेला नाही. धनंजय मुंडे यांनी डोळे उघडून बघितलं पाहिजे. डीबीटीसाठी एक समिती स्थापन करण्यात आली होती. मुख्यमंत्र्यांकडे शिफारस करण्यासाठी छाननी समिती स्थापन करण्यात आली होती. म्हणजे ही समिती जोपर्यंत मान्य करत नाही तोपर्यंत कोणतीही वस्तू डीबीटीच्या बाहेर वगळण्याचा कुणालाही अधिकार नाही. कृषी मंत्र्यांना सुद्धा नाही, मुख्यमंत्र्यांना नाही. अजितदादांनाही नाही. मुख्य सचिवांच्या नेतृत्वात ही समिती होती. एमएआयडीसी किंवा महाबीज स्वत: उत्पादन करतं. अशाच वस्तू डीबीटीच्या बाहेर राहतील. बाकी उत्पादन न केलेल्या प्रत्येक वस्तू डीबीटी अंतर्गत द्यायच्या असतील तर त्याचे पैसे हस्तांतरण करण्यात यावे अशा सूचना आहेत, हा जीआर आहे. मंत्री म्हणून वेळ दिला असता तर तुम्हाला हे कळलं असतं. बीडमध्ये जाऊन दादागिरी करायची, दमदाटी करायची. मामींची जमीनही बळकवायचे काम केलं आहे, असा हल्लाबोल दमानिया यांनी केला आहे.

# अंजली दमानिया पुराव्याशिवाय बोलत नाहीत-संदीप क्षीरसागर



बीड, (प्रतिनिधी): - अंजली दमानिया ह्या पुराव्याशिवाय बोलत नाही, त्यांनी जे म्हटले आहे ते बरोबरच आहे. धनंजय मुंडेंनी राजीनामा द्यावा ही तर मी पहिल्या दिवसापासून म्हणत आहे, वाल्मीक कराड काय इतका मोठा नाही त्याच्यावर कुणाचा वरदहस्त असल्याशिवाय काही घडू शकत नाही हे मी आधीपासून म्हणतोय, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी म्हटले आहे. आमदार संदीप क्षीरसागर म्हणाले की, वाल्मीक कराड एका मोठ्या रुग्णालयात आराम करत बीडचा मोर्चा टीव्हीवर बघत होता. त्या काळात त्यांना कोण भेटले, काय सुरक्षा दिली गेली. त्याला पुण्यातील रुग्णालयात कोणी डमिट केले असा सवालही त्यांनी केला आहे. जर सीडीआर तपासला तर सर्व गोष्टी समोर येतील. संदीप क्षीरसागर म्हणाले की, वाल्मीक कराडला व्हीआपी वागणूक दिली जात असल्याचे माध्यमांमध्येही दिसून आले आहे. त्यांना मंत्रिपदाचे संरक्षण मिळते आहे. त्यांच्या अंगावरचे गमजे, दौरे का काढले गेले नाही. माझी शंका आहे की फरार आरोपी आता सापडेल म्हणून. संदीप क्षीरसागर म्हणाले की, सुरेश धस यांच्या मतदारसंघातील कार्यक्रमाला मी जाणार आहे. मुख्यमंत्र्यांना आणि मंत्र्यांना विकास कामांसाठी भेटावेच लागते. तर सुरेश धस यांनीही मला कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यात आले आहे. संदीप क्षीरसागर म्हणाले की, संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर जे वातावरण तयार झाले, त्यानंतर अनेकांनी आपल्यावर काय अन्याय झाला हे सांगितले आहे. भीतीपोटी लोकं शांत बसले होते पण आता आपल्याला न्याय मिळेल या भावनेतून एक-एक प्रकरण समोर येत आहे. आमदार संदीप क्षीरसागर म्हणाले की, धनंजय मुंडे पालमकंत्री असताना ते जे वागले ते अगदी चुकीचे आहे. आम्हाला कोणत्याचे कामाचे भूमिपूजन त्यांनी करु दिले नाही. कुणीही उठून नारळ फोडत होते. कुणाही हेडवर त्यांनी पैसे वळवले आहे, ते पुराव्यासह दिले आहे. भविष्यात या सर्व गोष्टी उघड होतील. आता अधिकारीदेखील घाबरले आहेत.

पान १ वरून

### आ.सुरेश अण्णांचा...

विजयी झाल्यानंतर या कामाने भरारी घेतली असून नोव्हेंबर २०२४ पासून आजवर २० टक्के पेक्षा ज्यादा काम झाले असून आमदार सुरेश धस यांची कामाची धडाडी आणि पाठपुरावा आणि या तलावाच्या बारीक-सारीक तांत्रिक माहिती असल्यामुळे या तलावाच्या कामाने गती घेतल्या असून शासनाने देखील पुरेसा निधी उपलब्ध करून दिला असून मध्यंतरी झालेल्या विधानमंडळ अधिवेशनामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक रकमे ३०० कोटी रुपये या तलावाच्या कामासाठी निधी मंजूर करून या तलावाच्या पूर्णत्वाविषयी संकेत दिलेले आहेत आ.सुरेश धस यांनी त्यांच्या राजकीय जीवनातील सर्वात महत्त्वाकांक्षी असलेला हा प्रकल्प असून त्यांनी या प्रकल्पासाठी मुख्यमंत्र्यांनी उपस्थित राहावे यासाठी प्रयत्न केल्याने अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज या कार्यक्रमासाठी येत आहेत कृष्णा खोरे अंतर्गत असलेल्या या कृष्णा मराठवाडा योजनेअंतर्गत असलेल्या आष्टी सिंचन योजना क्रमांक तीन म्हणजे खुंटेफळ साठवण तलाव हा असून एकूण १.६८ टीएमसी पाणी आणि मराठवाड्याच्या हक्काचे संभाव्य चार टीएमसी पाणी येईल उपलब्ध होणार हे गृहीत धरून तलावाचे काम सुरू असून २८०१ कोटी रुपये किंमत असून २६ गावातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार असून त्याद्वारे २० हजार एकर शेतीला पाणी मिळणार आहे आणि आणखी ४ टीएमसी पाणी मंजूर झाल्यास त्या खुंटेफळं साठवण तलावातून आष्टी तालुक्यातील इतर तलावांमध्ये हे पाणी वितरित करण्यात येणार असल्यामुळे संपूर्ण आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये समाधान पसरले असून आमदार सुरेश धस यांच्या या भगीरथ प्रयत्नामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे उपस्थित होणाऱ्या या कार्यक्रमासाठी सुमारे एक लक्ष जनसमुदाय उपस्थित राहणार असून त्यासाठी ६५ हजार खुर्च्यांची सोय करण्यात आली असून महिला वर्गांनी देखील या कार्यक्रमासाठी यावे याचे नियोजन करण्यात आले आहे या भव्य दिव्य अशा या नियोजनामुळे हा कार्यक्रम यशस्वी होईल असा विश्वास संयोजकांनी व्यक्त केला आहे.

### ५८ दिवसानंतर...

पान १ वरून

परवानगीने केले आहे. पेरणीपूवी शेतीचीटी मशागत करावी लागते. लोकसभेची आचारसंहिता लागण्यापूर्वी या सगळ्या गोष्टी लागू करणायात आल्या आहेत. त्यांना शेतीची माहिती नसेल त्यामुळे पेरणीपूर्वी आणि पेरणीनंतर काय काय करावे लागते हे त्यांना माहिती नसेल. नॅनो खताबाबतीत पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेबांनी प्रोत्साहन दिले आहे. देशातील आपले पहिले राज्य आहे ज्यांने हे सुरू केले.अंजलीताईना माहिती नाही की दीड एकर फवारणी करण्यासाठी मला दोन माणसे लागतात. काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत नॅनोची किंमत सगळीकडे एकच आहे. त्यापेक्षा कमी पैशात ते खरेदी झाले. चार लाख शेतकऱ्यांनी ती फवारणी केली. वेळ वाचला, पैसे वाचले. शेतकरी उत्पन्नात वाढ झाले. उत्पन्नात ६० टक्के वाढ होते. चार लाख शेतकरी यांना फायदा झाला. याआधी त्यांनी अनेक जणांना बदनाम केले आता सध्या मला करत आहेत. नॅनो खताच्या खरेदीत भ्रष्टाचार झाला नाही. भ्रष्टाचार झाला म्हणणं म्हणजे शेतकऱ्यांसह देशाला फसवणूक करणे आहे, असे धनंजय मुंडे म्हणाले.

### त्या लाडक्या बहिणींना...

या दरम्यानच आता सरकारने अर्जांच्या छाननीला आणखी वेग दिला आहे.सरकार आला थेट अंगणवाडी सेविकांना लाभार्थी महिलांच्या घरी पाठवणार आहे. चारचाकी वाहन असणाऱ्या महिलांना लाडकी बहीण योजनेतून वगळण्याचा निर्णय याआधीच घेण्यात आला होता. या संदर्भात सरकार परिवहन विभागाकडून देखील माहिती मिळवत होती. त्यानंतर आता सरकार अंगणवाडी सेविकांना लाभार्थी महिलांच्या घरी पाठवणार आहे. यावेळी अंगणवाडी सेविकांच्या पडताळणीत जर महिलांच्या कुटुंबात चारचाकी असेल त्यांना लाडकी बहीण योजनेतून वगळण्यात येणार आहे. त्यामुळे या महिलांना मोठा धक्का बसणार असून त्यांना योजनेचे पैसे परत करावे लागणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार सासरे, दीर, अथवा घरातील इतरांच्या नावावर चारचाकी असेल आणि लाभार्थी महिला पती आणि मुलासोबत वेगळी राहत असेल तर या महिलेला योजनेचा लाभ सूरूच राहणार आहे. दरम्यान लाडकी बहीण योजनेची सुरूवात जुनपासून करण्यात आली होती.त्यानंतर जुलैपासून

पान १ वरून

महिलांच्या खात्यात सरकारने १५०० रूपये जमा करायला सुरूवात केली होती.आतापर्यंत महिलांच्या खात्यात सात हप्त्याचे १० हजार ५०० रूपये खात्यात जमा झाले आहेत. आता महिलांना फेब्रुवारी महिन्यात येणाऱ्या १५०० रूपयांची प्रतिक्षा आहे. हे पैसे कदाचित फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात मिळण्याची शक्यता आहे.दरम्यान हे पैसे खात्यात येईपर्यंत जर अर्ज बाद झाला तर सर्व पैसे परत करावे लागण्याची शक्यता आहे.

### आ.क्षीरसागरांनी घेतला...

यावेळी या विभागांशी संबंधित नागरिकांच्या असलेल्या तक्रारी यांचा निपटारा करण्याबात आ.संदीप क्षीरसागर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले. तसेच आ.क्षीरसागर यांनी या विभागांतर्गत झालेल्या आणि होत असलेल्या कामकाजाचा आढावा घेतला. या बैठकीस माजी आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### धनादेश वटला...

लाख रूपये दंड व एक महिना कारवासाची शिक्षा ठोठावण्यात आली. सदर प्रकरणात फिर्यादी तर्फे ॲड. शिवाजी साळवे यांनी कामकाज पाहिले. त्यांना ॲड. एस. बी राख, ॲड.टी.ए. जावळे, ॲड. मिलिंद वाघमारे यांनी सहकार्य केले.

### गेवराई तहसीलसमोर...

संघटनेचे तालुकाध्यक्ष राजेंद्र डाके पाटील यांनी गेवराई तहसील कार्यालयासमोर बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे.

### सुरेश धस यांच्या कार्यक्रमाला...

व्यासपीठावर येतील का? असा प्रश्न उपस्थित केला जात होता. जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याची उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितित पार पडलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत सुरेश धस (डीशीह उऱ्हरी) आणि धनंजय पंकजा मुंडे समोरासमोर आले होते. त्यानंतर आता सुरेश धस यांच्या आष्टी मतदारसंघातील एका शासकिय कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र

पान १ वरून

फडणवीस यांच्या समवेत पंकजा मुंडे या देखील सहभागी होणार असल्याची माहिती आहे. धनंजय मुंडे यांच्यावरील आरोप आणि राजीनाम्याच्या मागणीवरून असलेला तणाव पाहता पंकजा मुंडे यांची आष्टीतील या कार्यक्रमातील हजेरी महत्त्वाची ठरणार आहे.सुरेश धस यांच्यामुळे राज्यात बीडची बदनामी झाली असा आरोप पंकजा मुंडे यांनी याआधी केला होता. त्यामुळे उद्या आष्टी येथे होणाऱ्या कार्यक्रमात धस आणि पंकजा मुंडे एकमेकांशी संवाद साधतात का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. आष्टीच्या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हेलिकॉप्टरने आगमन होणार आहे. त्यांच्यासोबतच पकंजा मुंडे या देखील आष्टीला जाणार असल्याची माहिती आहे. राज्य शासनाचा महत्त्वाचा कार्यक्रम असल्याने आणि मुख्यमंत्र्यांचे जिल्ह्यात आगमन होणार असल्याने त्या उपस्थित राहणार असल्याचे सांगितले जाते.कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प अंतर्गत आष्टी उपसा सिंचन क्रमांक तीन शिंपोरा ते खुंटेफळ साठवण तलावाच्या पाईपलाईन कामाची पाहणी तसेच बोगदा कामाचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सकाळी साडेअकरा वाजता होणार आहे.

### मल्टीस्टेट ठेवीदारांचा...

लग्न थांबले आहेत. काहींना वेड लागण्याची वेळ आली आहे. यातील काही संस्था चालक अटक आहेत. पण ठेवीदारांचे हक्काचे पैसे मिळणार कधी आसा प्रश्न उपस्थित केला जात असून, याकडे कोणाचे लक्ष नाही. यामुळे संतप्त ठेवीदारांनी प्रा. सचिन उबाळे यांच्या नेतृत्वाखाली आज भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय असा जन आक्रोश मोर्चा काढला. यावेळी पालकमंत्री अजित दादा न्याय द्या, सर्व मल्टीस्टेटची एसआयटी मार्फत चौकशी करा, ठेवीदारांचा संघर्ष योध्दा सचिन भैय्या उबाळे, चोरांचा सोडा हात ठेवीदारांना द्या साथ, मल्टीस्टेट संचालकांचा धिक्कार असो, अर्चना कुटेला अटक करा, मल्टीस्टेटच्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन प्रॉपर्टी जप्त करा असे फलक हातात होते. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा धडकल्यानंतर मागण्यांचे निवेदन देण्यात आले. या मोर्चात मोठ्या प्रमाणात ठेवीदार सहभागही झाले होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

# वडवणी तालुका शिवसेनेच्या वतीने विविध मागण्या

## मागण्या मान्य न केल्यास शिवसेना स्टाईलने रस्त्यावर उतरू



वडवणी, (प्रतिनिधी):-वडवणी तालुका शिवसेनेच्या वतीने मागण्यांचे निवेदन देण्यात आले १) वडवणी तालुक्यातील २०२३२०२४ आतिव्रष्टी ज्रूल पुर्ण झालेल्या लाभार्थी शेतकऱ्यांना तात्काळ अनुदान देण्यात यावे. २) अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेले ठिंबक, स्पिक्लर, फळबाग चे अनुदान तात्काळ देण्यात यावे ३) पीएम, सीएम अनुदान वंचित शेतकर्यांना देण्यात यावे ४) प्रलंबित असणारा पिकविमा तात्काळ शेतकर्यांच्या खात्यात जमा करण्यात यावा ५) लाडकी बहीण योजनेमध्ये लावलेले निकष तात्काळ रद्द करुन सरसकट लाभ देण्यात यावा ६) बीड - परळी व पाडळसिंगी वडवणी हायवे वरील जमीनीचे भुसंपादन करुन समध्दी महामार्गाच्या आधारे शेतकर्यांना मावेजा देण्यात यावा. ७) सरकारने केलेली एसटीच्या दरातील भाडेवाढ रद्द करण्यात यावी. या व इतर मागण्यांचे निवेदन तहसील कार्यालय वडवणी येथे शिवसेना तालुका प्रमुख मा. विनायक बप्पा मुळे यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले या वेळी उपस्थित युवराज मामा शिंदे, जेष्ठ शिवसैनिक बंडू मामा जाधव, शहर प्रमुख शिवाजी दादा दुटाळ युवासेनेचे तालुका प्रमुख नवनाथ मोरे, सरपंच संजय धपाटे, सोसायटी संचालक मुन्ना पवार, उध्दव काकडे, गणेश मेहत्रे, उपतालुका प्रमुख श्रीराम झाटे, अकाश सावंत,एकनाथ पवार, अविनाश बोंद्रे,ज्ञसंजय पडघन, राजेंद्र चाळक, ज्ञि फिटर, दिपक दुटाळ सह उपस्थित सर्व शिवसैनिक वरील मागण्या मान्य झाल्या नाहीत तर शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्र राज्यांचे मा. मुख्यमंत्री मा. उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशाने व शिवसेना नेते मा. सुनिलजी प्रभू, मा. विश्वनाथ नेरूरकर मा. अंबादास दानवे, शिवसेना उपनेत्या सुषमाताई अंधारे संपर्क प्रमुख परशुरामजी जाधव, शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेना तालुकाप्रमुख मा विनायक बप्पा मुळे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना स्टाईलने रस्त्यावर उतरून भव्य आंदोलन करण्याचा तहसीलदार यांना इशारा देण्यात आला.

# दिंद्रुडमध्ये भक्तिमय वातावरणात अखड हरिनाम सप्ताहला सुरुवात

## आठ दिवस महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची हजेरी



दिंद्रुड, (प्रतिनिधी):-माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे गेल्या ३५ वर्षांपासून चालत आलेल्या अखंड हरिनाम सप्ताह रविवार (२ फेब्रुवारी) पासून भक्तिमय वातावरणात खोलेश्वर मंदिर प्रांगणात सुरुवात झाला आहे. गेल्या दोन पिढ्यांपासून जगद्रु श्री संत तुकाराम महाराज यांच्या वैकुंठ गमन सोहळा दिन व विठ्ठल रुक्मिणी मंदिर वर्धापन दिनानिमित्त हा सप्ताह चालू आहे. या सप्ताहात गावातील विविध जाती धर्मातील लोक सहभागी होऊन विविध धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घेतात. ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ, भागवत कथा, गाथा भजन, व रात्रौ कीर्तन महोत्सव असा आठ दिवस भक्तीमय वातावरणात हा सोहळा साजरा करण्यात येतो. या किर्तन महोत्सवात महाराष्ट्रातातील नामवंत कीर्तनकारांची हजेरी लागणार आहे यामध्ये ह भ प किशोर महाराज बुरंगे यांच्या सुमधुर वाणीतून भागवत कथा संपन्न होत आहे.रविवार दि. २ फेब्रुवारी रोजी महादेव महाराज बोराडे सोमवार रोजी मच्छिंद्र महाराज निकम, मंगळवार रोजी अर्जुन महाराज लाड,बुधवार रोजी विठ्ठल महाराज आश्रम गंगापूर, गुरुवारी एकनाथ महाराज माने, शुक्रवारी अच्युत महाराज दस्तापुरकर, शनिवारी जयेश महाराज भाग्यवंत यांची कीर्तन सेवा होणार आहे. विठ्ठल रुक्मिणी मंदिर वर्धापन दिनानिमित्त दिनांक ८ रोजी हभप हरिदास महाराज पवार यांचे सकाळी ११ ते १ या वेळेत होईल व रविवार दिनांक ९ रोजी सकाळी ९ ते ११ भरत महाराज चौधरी यांचे काल्याचे किर्तन होईल व काल्याच्या कीर्तनानंतर समस्त गावकऱ्यांच्या वतीने महाप्रसाद होईल.या सप्ताह मध्ये युवकांसह ज्येष्ठ भाविक भक्त यजमान मध्ये पांडूरंग एकनाथ काकडे, मच्छिंद्र बापूराव शिंदे, गोविंद बालासाहेब ठोंबरे, बालासाहेब रामकृष्ण ठोंबरे,इंजि गणेश महादेव पवने, चंद्रकांत बाजीराव ठोंबरे, निलेश भगवान ठोंबरे,सोमा श्रीमंत चव्हाण, गोवर्धन गणपण ठोंबरे यांनी किर्तन यजमान सेवा घेतली आहे . सप्ताहात दररोज भाविक भक्त तीन वेळा अन्नदान पंगत करत आहेत. महाराष्ट्रातील नामवंत किर्तनकारांसह भजनी मंडळ, गायक, मृंदागाचार्य यांचा समावेश असणार आहे.तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या अखंड हरिनाम सप्ताह उपस्थित राहून कीर्तन श्रवण व महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन संयोजक खोलेश्वर तरुण मित्र मंडळ व दिंद्रुड ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# डॉ.प्रकाश महिंद्रे यांचे दु:खद निधन



पुण, (प्रतिनिधी):- बीडच्या माजी खासदार स्व. केशरबाई क्षीरसागर यांचे जावई व माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांचे मेव्हणे डॉ. प्रकाश महिंद्रे यांचे दि. ०२ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी पुणे येथे त्यांचे घरी हृदय विकाराने दुःखद निधन झाले. डॉ.प्रकाश महिंद्रे हे महाराष्ट्र शासनाच्या फलोउत्पादन विभागाचे संचालक होते. त्यांनी त्यांच्या काळात हजारो एकर शेतीवर फळबागा निर्माण केल्या. डॉ. प्रकाश महिंद्रे हे मुळचे दिग्रस जि.यवतमाळ येथील असुन त्यांनी जिल्हा मृदु संधारण अधिकारी म्हणुन कामास सुरुवात केली. पुढे त्यांची विभागीय मृद संधारण अधिकारी म्हणून पदोन्नती झाली. त्यांनी अकोला, नाशिक व पुणे या विभागात सेवा केली. पुढे शासनाने त्यांची फलोउत्पादन संचालक म्हणून निवड केली. त्यांच्या विभागात उत्कृष्ठ कामगिरी केल्याबद्दल शासनाने त्यांचा गौरव केला. तत्कालीन लोकसभा अध्यक्ष बळराम जाखड यांच्या हस्ते त्यांना प्रियदर्शनी अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले होते. त्यांचा महाराष्ट्रात मोठा चाहता वर्ग आहे. त्यांनी नागपुर विद्यापीठातुन एम.एस.सी.पदवी धारण केली होती. त्यांच्या पश्चात पत्नी डॉ. प्रिया महिंद्रे, एक मुलगा, स्नुषा व दोन मुली असा परिवार आहे.

# जवळा जि.प.प्राथमिक शाळेचे विद्यार्थी गितांवर थरकले...



दिंद्रुड, (प्रतिनिधी):-स्नेह संमेलनाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा या हेतूने धारूर तालुक्यातील जवळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वतीने स्नेह संमेलनाचे आयोजन सोमवारी करण्यात आले होते. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी कलागुणांचा आविष्कार करत उपस्थितांची मने जिंकली. जवळा फ. येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक आदिनाथ चांदबोधले, सहशिक्षक रामकिसन व्हरकटे,आरती स्वामी, भाग्यशाला करपे यांनी शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या विविध कला गुणांना वाव मिळावा या हेतूने स्नेह संमेलनाचे आयोजन सोमवारी केले होते. अंगणवाडी ते इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक गितांवर नृत्य सादर करत उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच त्रिंबक साबळे होते. तर माजी सरपंच सतीश मिसाळ, सुरेश साबळे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रशांत चोपडे, ज्येष्ठ पत्रकार बंडुजी खांडेकर, संतोष स्वामी, अमोल ठोंबरे, गणेश काटकर यांच्या सह जवळा पंचक्रोशीतील प्रतिष्ठित नागरिक कार्यक्रमास आवर्जून उपस्थित होते. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पुजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रस्ताविक सहशिक्षीका आरती स्वामी यांनी केले. जिल्हा परिषद शाळा विद्यार्थ्यांच्या शालेय गुणांसोबत शैक्षणिक दृष्ट्या वाव देण्यासाठी कशा सक्षम आहेत या बाबत मार्गदर्शन स्वामी यांनी माहिती दिली. पत्रकार बंडू जी खांडेकर यांनी शाळेच्या आवश्यक बाबींसाठी आम्ही सहकार्य करून त्या मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. ज्ञानदाना सोबतच विद्यार्थ्यांच्या सार्वभौम विकासासाठी ग्रामपंचायत सदैव शाळा व विद्यार्थ्यांच्या पाठीशी असल्याचे सरपंच त्रिंबक साबळे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचलन सहशिक्षक रामकिसन व्हरकटे यांनी केले.

# ज्ञानभाषा व्हावी माझी मराठी!




मराठी भाषा बोलणाऱ्या प्रत्येकाला याचा निश्चित अभिमान आहे मात्र आता काळाच्या ओघात काही शहरी संरचनेत सध्या प्रचलीत ज्ञानभाषा म्हणून इंग्रजीचा वापर आपण करीत आहोत. सध्या ज्ञानमाषा इंग्रजी आहे असे मान्य करून मुलांना इंग्रजीतून शिक्षण देणा-यांची संख्या अधिक झाली आहे आणि दुसरीकडे आपल्या भाषेत ज्ञान उपलब्ध नाही असे आपण जणू कबूल करून सध्या वाटचाल करीत आहोत. यासाठी मराठी ज्ञानभाषा होणे आवश्यक आहे हे तर स्पष्टच आहे परंतु ही वेळ का आली याचाही प्रत्येकाने विचार करण्याची आज गरज आहे. भारतावर ब्रिटिशांनी १५० हुन अधिक राज्य केले. त्यापूर्वीच्या काळात आपण शास्त्र, विज्ञान आणि इतर सर्व ज्ञानासाठी कोणती भाषा वापरत होतो हे आपण जाणून घेतले पाहिजे. इंग्रजांनी इंग्रजीचा प्रसार आपल्या साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी केला. आज ते गेले असले तरी आपली मानसिकता बदललेली नाही आणि एक प्रकारे ज्ञानभाषा म्हणजे इंग्रजी हा समज आपण करून घेतला आणि तो येणाऱ्या पिढीसाठी एकमेव पर्याय मानून त्यावरच आजही स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांच्या पूर्ण कालवधीनंतरही ठाम आहोत. मराठीला ज्ञानभाषा म्हणून ओळख मिळवून देताना आपण जगातील इतर देशांकडेही बघायला हवे. ज्या देशात ब्रिटिश साम्राज्य शिरकाव करू शकले नाही असा लगतचा देश फ्रान्स, दोन युद्धात ब्रिटन विरोधी लढणारे जर्मनी तसेच मित्र राष्ट्र म्हणून साथ दिलेल्या रशिया या देशांनी देखील सर्वच क्षेत्रात तोडीस तोड विज्ञान आणि संशोधन कार्य केले. या सर्व देशांची भाषा अर्थातच त्यांची राष्ट्रभाषाच होती आणि त्याच भाषेचा वापर या देशांनी ज्ञानभाषा म्हणुन केला आणि आजही करीत आहे. अशिया खंडातील चीन, द. कोरिया, उ. कोरिया, जपान आदी देशांबाबत देखील आपणास याच पध्दतीने सांगता येईल यापैकी कोणत्याही देशात इंग्रजी ही ज्ञानभाषा नाही. आपला देशात इंग्रजी भाषा थोपली गेली आणि आपण आपली भाषा विसरून इंग्रजीलाच ज्ञानभाषा मानायला लागलो आहोत आणि या खेरीज दुसरी भाषा शक्यच नाही असाही एक मोठा गैरसमज आपण करून घेतलेला आहे. भारतीय इतिहास आपण बघितला तर लक्षात येईल की संस्कृत, पाली, मगधी अशा विविध भाषा आपला ज्ञानभाषा होत्या. अगदी आपली मायबोली देखील एक ज्ञानभाषाच होती. संपर्कसूत्र म्हणून वापरणं वेगळं आणि ज्ञानभाषा वेगळी. ब्रिटिश येणापूर्वी भारतात मुगल साम्राज्य होते. त्या काळी ज्ञानभाषा म्हणून त्यांनी फारसी, ऊर्दूचा वापर केला. शिवकालीन महाराष्ट्रात ज्ञानभाषा मराठीच होती. मला' स्वप्न मराठी भाषेत पडतात अनं चित्रपट अभिनेता नाना पाटेकर सांगतो त्यावेळी त्याचा खरा अर्थ आपण जाणून घेतला पाहिजे. प्रत्येकाला सर्वप्रकारे बोलीभाषेत आणि त्याच्या मातृभाषेत प्राप्त होणारी माहिती झटकन कळते. अनाकलनीय अशा इंग्रजी भाषेला ज्ञानभाषा म्हणून मान्य केल्याने आपण बहुतांश विद्यार्थ्यांना संकटात टाकतो. इंग्रजी भाषा आत्मसात करणे वेगळे आणि मराठीत विचार करून त्याचा इंग्रजीत अनुवाद करून ते मांडणं वेगळं... यात अनेकजण न्यूनगंडाचे शिकार होतात. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये यामुळे आपण मागास आहोत असा गैरसमज होतो. त्याचे अनेक मानसिक परिणाम होतात.. अगदी बुध्दीमान असून देखील भाषिक दडपणाने अनेक जण मग समाजात वावरण्यास घाबरतात असा अनुभव आहे. ज्ञानभाषा म्हणून आपण मराठीचा वापर करण्यासाठी विशिष्ट पर्यायी शब्द शोधण्याची आणि क्लीष्ट मराठी भाषा करण्याची आवश्यकता नाही. मराठी भाषा आजवरच्या विकासात इतर भाषांना स्विकारत विकसित झाली आहे. इतर भाषांमधील शब्द आपण स्विकारणे त्याला पर्याय न काढता त्याचा स्वीकार केल्याने आजची ही मराठी भाषा अधिक संपन्न भाषा झाली आहे. भाषेचे काही शुद्धतेचे नियम असतात. ते लिखाणाबाबत वापरले जातात. मात्र बोलीभाषेत इतर भाषेतील शब्द सहज येतात, आणि ते स्विकारले जाऊन वापरातही येतात. देशादेशातील व्यापार व इतर बंधांमुळे भारतीय भाषांमध्ये जसे इतर भाषांमधील शब्द आले तसे ते मराठी भाषेतही आले आहेत. अरबी, फारशी, ऊर्दू भाषांप्रमाणेच मराठी भाषेत इंग्रजी शब्द देखील मोठ्या प्रमाणात आले. यामुळे मराठी भाषेचे एकप्रकारे विस्तारीकरण झाले आणि ही प्रक्रिया अव्याहतपणे चालू आहे. याचाच पुढचा टप्पा आपली मराठी ज्ञानभाषा म्हणून विकसित करण्यात आपल्याला गाठायचा आहे. आपण ग्रेगरियन कैलेंडर स्विकारले आणि सर्व व्यवहारासाठी याचा वापर आपण करतो. अगदी आर्थिक वर्ष, शैक्षणिक वर्ष यांची आखणी त्याच्याच आधारे करतो. परंतु आपले सण-उत्सव मात्र आपण भारतीय ऋतू आणि पंचांग याचा वापर करतो. याच पद्धतीने ज्ञानभाषा म्हणून मराठीचा विस्तार करताना आपल्याला दोन्हीचा सूवर्णमध्य साधायचा आहे. शक्य तिथं आणि मुळ मराठी शब्द उपलब्ध आहे अशा ठिकाणी आपण आवर्जून त्याचा वापर करणे, मराठीचा आग्रह धरणे यातून आपणास अपरिहार्यपणे स्विकार करावे लागले तर इतर भाषांमधील शब्दही स्विकारून आपण मराठीला ज्ञानभाषा करू शकतो हे नक्की!

**प्रशांत विजया अनंत दैठणकर**
जिल्हा माहिती अधिकारी,
बीड -९८२३१९९४६६

# मुलांतील सुप्त कलागुणांना वाव द्या-मधुकरजी सावंत

वडवणी, (प्रतिनिधी):-पालकांनी आपल्या पाल्यामध्ये कोणते सुप्त गुण दडलेले आहेत याचा शोध घेऊन, त्या सुप्त कलागुणांना वाव देत त्यांचे करियर घडवावे असे विचार से. नि. अपर पोलीस अधीक्षक श्री. मधुकरजी सावंत साहेब (सीआयडी,पुणे) यांनी व्यक्त केले. येथील कै. आण्णासाहेब पाटील सेवाभावी संस्था, चांदेगाव, संचलित न्यू व्हिजन इंग्लिश स्कूल नेकनूर या शाळेचा ११ वा वार्षिक स्नेसंमेलन सोहळा आणि यशस्वी विद्यार्थ्यांच्या कौतुक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी ते उद्घाटक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कै अण्णासाहेब पाटील सेवाभावी संस्था चांदेगाव चे अध्यक्ष मा श्री रमेशजी पोकळे होते. यार्षीच्या वार्षिक स्नेहसंमेलनाची संकल्पना वृक्षसंवर्धन आणि भारतीय लोकनृत्य ही होती. पुढे बोलताना त्यांनी, परिश्रम, जिद्द, चिकाटी आणि काबाडकष्टाशिवाय जीवनात यशस्वी होता येत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांनी कष्ट करण्याची तयारी ठेवली पाहिजे आणि कोणत्याही प्रकारचे काम करण्याची लाज बाळगू नये असे आवाहनही यावेळी सावंत यांनी केले. यावेळी अध्यक्षीय समारोप करताना रमेश पोकळे यांनी न्यू व्हिजन इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सर्वांगीण विकास साधून, तसेच अभ्यास करून, कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होऊन आपल्या पालकांचे व शाळेचे नाव उज्ज्वल करावे असे म्हणत शाळेच्या वतीने आगामी काळात उच्च माध्यमिक शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. सर्व मान्यवर प्रमुख पाहुण्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात मा. श्री.मधुकर




सावंत साहेबांचे पोलीस सेवेतील गुणवत्ता पूर्ण योगदान त्यांची कर्तव्यावरील निष्ठा यासाठी त्यांना राष्ट्रपती पदकाने सन्मानित करण्यात आले होते. म्हणून त्यांचा न्यू व्हिजन इंग्लिश स्कूलच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्याच बरोबर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले मौलाना सय्यद साबेर अली यांनी मोबाईल हा मुलांसाठी शाप आहे, मोबाईल मुळे विद्यार्थी बिघडत चालले आहेत, गरज असेल तरच मुलांच्या हातात मोबाईल द्या असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला. उपशिक्षणाधिकारी श्री काकडे सर यांनी शैक्षणिक क्षेत्रातील विविध प्रकारच्या सुविधा आणि भावी काळात होणाऱ्या बदलांची माहिती दिली.तसेच शिक्षण विस्तार अधिकारी श्री तोडकर साहेब ,युवा उद्योजक सय्यद कौसरभाई, युवा उद्योजक तेजस शिंदे, बन्सीधर हावळे सर, ज्येष्ठ व शिक्षणविस्तार अधिकारी श्री रसाळ सर वारकरी संप्रदायाचे जिल्हा अध्यक्ष मा श्री ह. भ. प. हरिदास जोगदंड , यांची कार्यक्रमाला प्रमुख उपस्थित होते. रसाळ सरांनी विद्यार्थी ,शिक्षकासह शाळेने घेतलेल्या विविध प्रकारच्या उपक्रमाबाबत कौतुक केले. तसेच सरपंच अनिताताई लांडगे,उपसरपंच श्री सचिन शिंदे यांची देखील कार्यक्रमास उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्या सौ स्वाती पोकळे यांनी केले. तर शेवटी संस्था सचिव प्रा. गणेश पोकळे यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे आणि संमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील शिक्षक विद्यार्थी पालक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना घेतलेल्या परिश्रमाबद्दल आभार मानले. या पत्रकार खालेद भाई, तुळशीराम शिंदे,अशोक शिंदे,शहाजी भोसले, राजकुमार चोबे , खारके सर हे उपस्थित होते. विद्यार्थी, पालक, शिक्षक, ग्रामस्थ, शेतकरी, आणि विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक

# मराठवाडा पत्र

● छ.संभाजीनगर, बीड, जालना, नांदेड, परभणी, धाराशिव, लातूर ●

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

बुधवार,दि. ५ फेब्रुवारी २०२५ पान - ४

# आ.सुरेश अण्णांचा ड्रीम प्रोजेक्ट

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या साक्षीने सुरेश धस यांच्या भगीरथ प्रयत्नातून साकारणार खुंटेफळ साठवण तलाव



आष्टी, (प्रतिनिधी):-आष्टी तालुक्यातील कायमस्वरूपी दुष्काळाने शेतकरी शेतमजूर यांच्या हालअपेष्टा अनुभवलेल्या आ.सुरेश धस यांनी राजकीय कारकिर्दीची सुरुवातच या कष्टकरी शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये चांगले दिवस येण्यासाठी कायमस्वरूपी सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून द्यावे या ध्येयाने राजकारणात उतरलेल्या आ.सुरेश धस यांनी खुंटेफळ साठवण तलाव पूर्ण करण्याचे ध्येय समोर ठेवून अथक परिश्रम केले असल्याने त्यांच्या या भगीरथ प्रयत्नांना यश आले असून आज महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या शुभहस्ते थेट जलवाहिनी कामाच्या बोगदा कामाचा शुभारंभ करण्यात येणार आहे. यावेळी महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, राज्याचे जलसंपदा मंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्यासह बीड जिल्ह्यातील खा. बजरंग सोनवणे, आ.प्रकाश सोळंके आ.नमिता मुंदडा आ.संदीप क्षीरसागर आ.विजयसिंह पंडित पाथर्डीच्या आमदार मोनिकाताई राजळे उपस्थित राहणार आहेत खुंटेफळ साठवण तलावाची मंजुरी सन २० १४ मध्ये मिळाली परंतु मधल्या कालावधीमध्ये पर्यावरणाची परवानगी न मिळाल्यामुळे तलावाचे काम बंद होते परंतु सन २०१८ मध्य सुरेश धस विधान परिषद सदस्य झाले आणि या कामाला पुन्हा गती मिळाली त्यांनी तत्कालीन खा.प्रीतम मुंडे यांचे बरोबरीने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या समवेत केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाची परवानगी मिळवली आणि या रखडलेल्या कामाला संजीवनी मिळाली आणि काम सुरू झाले परंतु खुंटेफळ साठवण तलावामध्ये भूसंपादित झालेल्या गावांचे पुनर्वसन आणि इतर काहीही कार्यवाही न झाल्यामुळे अखेर सुरेश धस २०२४ विधानसभा निवडणुकीमध्ये प्रचंड मताधिक्याने ▶▶पान २ वर

# मल्टीस्टेट ठेवीदारांचा जन आक्रोश मोर्चा




बीड, (प्रतिनिधी): - जिल्ह्यातील अनेक मल्टीस्टेट संस्थांनी रातोरात गाशा गुंडाळून लाखो ठेवीदारांची फसवणूक केली. मेहनतीने कमवलेला पैसा या मल्टीस्टेट मध्ये अडकून पडला आहे. यामुळे अनेकजण रस्त्यावर आले आहेत. याकठे प्रशासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी जिल्ह्यातील ठेवीदारांनी 'चोरांचा सोडा हात ठेवीदारांना द्या साथ' म्हणत आज जिल्हाधिकारी कार्यालयावर प्रा. सचिन उबाळे यांच्या नेतृत्वाखाली जन आक्रोश मोर्चा काढून आपल्या विविध मागण्यांचे निवेदन दिले. जिल्ह्यात ज्ञानराधा, साईराम, शुभ कल्याण, राजस्थानी, जिजाऊ, मोतीश्री अर्बन, लक्ष्मीमाता अर्बन, भराठवाडा अर्बन या मल्टीस्टेट दिवाळखोरीत निघाल्या आहेत. लोकांच्या घामाच्या पैशावर या संस्था चालकांनी मजा मारली ठेवी मागण्यास आल्यानंतर ठेवी परत न देऊ शकल्याने रातोरात पळून गेले होते. यामुळे बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातील लाखो ठेवीदारांचे कोट्यावधी रुपये अडकून पडले आहेत. यामुळे अनेकांच्या लेकरांचे शिक्षण, ▶▶पान २ वर

# धनादेश वटला नाही

## एक महिन्याचा कारावास, लाख रूपये दंडाची शिक्षा

बीड, (प्रतिनिधी):- दिलेला धनादेश वटला नसल्याने न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवत एक महिन्याचा कारावास व एक लाख रूपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे. हा निर्णय बीड येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी जोशी यांनी दिला आहे. जगदीश दत्तात्रय भोकरे (रा. एमआयडीसी वाळूज, औरंगाबाद/ छत्रपती संभाजीनगर) यास बीड येथील डॉ. शिवप्रसाद चरखा यांनी औषध बनविण्याच्या कारखान्याचे बांधकाम करण्यासाठी ५० हजार रूपये दिले होते. सदरचे बांधकाम न केल्यामुळे जगदीश दत्तात्रय भोकरे यांनी रकमेच्या परतफेडी पोटी ५० हजार रूपयांचा धनादेश फिर्यादीस दिला होता. परंतु आरोपीने दिलेला धनादेश वटला नाही. त्यामुळे आरोपीच्या विरुध्द फिर्यादी डॉ. चरखा यांनी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी बीड येथे धनादेश अनादारित झाल्यामुळे फौजदारी फिर्याद दाखल केली होती. सदर प्रकरणात साक्षी, पुराव्याअंती व फिर्यादीतर्फे सादर करण्यात आलेल्या पुराव्यानिशी आरोपी विरूध्द गुन्हा सिध्द झाल्या असल्याने आरोपीस एक ▶▶पान २ वर

# ५८ दिवसांनंतर धनंजय मुंडे आक्रमक

## दमानियांच्या प्रत्येक आरोपाचं दिलं सडेतोड उत्तर



मुंबई, (वृत्तसेवा) :- अंजली दमानिया यांनी माझ्यावर केलेले सर्व अधिकार धांदत कोठे आहे. माझ्यावर आज झालेले आरोप हे दमानियांच्या स्वभावाप्रमाणे सनसनाटी निर्माण करण्यासाठी त्यांनी केले आहे. आजपर्यंत त्यांनी माझ्यावर केलेले आरोप हे एकही आरोप खरे ठरले नाही, असे म्हणत मंत्री धनंजय मुंडे यांनी अंजली दमानिया यांनी केलेले आरोप फेटाळले आहेत. डीबीटीबाबत सर्व अधिकार मंत्री आणि मुख्यमंत्र्यांना आहेत. अजंलीताई शेतकरी नसल्याने त्यांना माहीत नसेल, असा टोला देखील मुंडेंनी लगावला आहे. धनंजय मुंडे म्हणाले, मला बदनाम केले जात आहे. आज ५८ वा दिवस आहे माझ्यावर मिडीया ट्रायल सुरू आहे.कोण करत आहे माहीत नाही. डीबीटीमधून कोणतीही बाब वगळण्याचे आणि समाविष्ट करण्याचे अधिकार मंत्री आणि मुख्यमंत्र्याचे आहेत. संपूर्ण प्रक्रिया वित्तमंत्री आणि मुख्यमंत्री यांच्या ▶▶पान २ वर

# आ.क्षीरसागरांनी घेतला विविध विभागांचा आढावा



## महसूल,बांधकाम,कृषी, जि.प.ची आढावा बैठक

बीड, (प्रतिनिधी):- बीड मतदारसंघातील विविध विषयांच्या अनुषंगाने आ.संदीप क्षीरसागर यांनी महसूल विभागांतर्गत बीड व शिरूर कासार तहसिल कार्यालय, सार्वजनिक बांधकाम तसेच जिल्हा परिषदेतील बांधकाम, ग्रामीण पाणीपुरवठा विभागांची बैठक घेऊन आढावा घेतला. यावेळी या विभागांशी निगडित नागरिकांच्या तक्रारींचा निपटारा करण्याचे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी अधिकाऱ्यांना दिले. मतदारसंघातील सामान्य लोकांची सरकारी कार्यालयात अडकलेली कामे तसेच जनसामान्यांच्या तक्रारींच्या अनुषंगाने तसेच विभागांतर्गत होत असलेले कामकाज यांचा आढावा घेण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि.४) रोजी बीड येथील शासकीय विश्रामगृहात बैठक घेतली. महसूल विभागांतर्गत बीड व शिरूर कासार तहसिल कार्यालय, कृषी विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच जिल्हा परिषद अंतर्गत बांधकाम विभाग, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना आदी विभागांचा आ.क्षीरसागर यांनी आढावा घेतला. ▶▶पान २ वर

# बोगस विमा प्रकरणात ९६ सीएससींवर कारवाई

बीड, (प्रतिनिधी): - प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत खरीप हंगाम २०२४ मध्ये पीक विमा पोर्टलवर बोगस विमा भरण्यात आला होता. भौगोलिक क्षेत्र नसलेल्या गावात अवैध पीक विमा भरणाऱ्या राज्यासह परराज्यातील ९६ सीएससींचे आयडी ब्लॉक करण्यात आले आहेत. यात बीड जिल्ह्यातील ३५, तर परळीमधील २२ सीएससींचे आयडी आहेत. राज्यातील इतर जिल्ह्यातही असा प्रकार आढळून आला होता. परभणी जिल्ह्यात खोट्या कागदपत्रांद्वारे बोगस पीक विमा भरला होता. कोणतेही भौगोलिक क्षेत्र अस्तित्वात नसताना तेथे खोटे सातबारा, आठ-अ सारखे महसुली अभिलेख तयार करून एकूण ९६ सीएससी आयडीधारकांच्या आयडीमधून पीक विमा नोंदणी करून शासनाची फसवणूक करण्यात आली होती. त्यामुळे सदरील ९६ सीएससी आयडी ब्लॉक करण्याची सूचना कृषी संचालक विनयकुमार आवटे यांनी सीएससी कंपनीला केली होती. बनावट पीक विमा भरणारे ३५ सीएससीधारक हे बीड जिल्ह्यातील आहेत. त्यापैकी २२ जणांचे सीएससी आयडी हे परळी शहर व तालुक्यातील आहेत. उर्वरित अंबाजोगाईतील ६, बीडमधील १ व इतर ६ आयडीधारक हे इतर तालुक्यांतील असल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. इतर राज्यांतील ७ आयडी आहेत.

# गेवराई तहसीलसमोर अन्नत्याग आंदोलन

गेवराई, (प्रतिनिधी):- गेवराई तहसील कार्यालयात पुरवठा विभागात गेल्या दोन वर्षांपासून राशन दुकानदार यांनी दिलेले आधार सिडिंग व मयत अथवा विवाहीत मुलीचे नाव डिलीट केले जात नाहीत. या कार्यालयातुन ७५० च्या वर पी एच एच व अंत्योदय अन्न योजना कार्ड परस्पर डिलीट करण्यात आल्यामुळे हे कार्डधारक राशन पासून वंचित आहेत. याबाबत राशन दुकानदार यांनी वाटप केलेल्या कमिशन बाबत जाणिवपूर्वक विलंब करण्यात येत आहे. या संदर्भात २४ जानेवारी रोजी तहसीलदार संदीप खोमणे यांना राशन दुकानदार संघटना वतीने निवेदन देऊन तात्काळ कारवाई करावी अशी मागणी होती. याबाबत तहसीलदार यांनी काहीच कारवाई न केल्याने राशन दुकानदार ▶▶पान २ वर

# सुरेश धस यांच्या कार्यक्रमाला पंकजा मुंडेही हजर राहणार!



मुंबई, (वृत्तसेवा):-बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणानंतर जिल्ह्यातील राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे. भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी या प्रकरणावरून धनंजय मुंडे यांना टारगेट केले आहे. वाल्मीक कराड याचा संतोष देशमुख खून प्रकरणाशी असलेला संबंध आणि त्याची धनंजय मुंडे यांच्याशी असलेली जवळीक यावरून धस दररोज नवनवे आरोप करत आहेत. राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे (झरपज्ञरक्षर चींपवश) यांनी नुकताच जालना येथे राजकारण गढूळ पाण्यासारखे झाले आहे. लोक सुपारी घेऊन आरोप करतात, अशा शब्दात आमदार सुरेश धस यांच्या वर अप्रत्यक्ष निशाणा साधला होता. सरपंच संतोष देशमुख हत्येनंतर मुंडे आणि धस यांच्यातील राजकीय संबंध कमालीचे ताणले गेले आहेत. विधानसभा निवडणुकीत पंकजाताईंनी आपल्या विरोधात काम केले, असा आरोप सुरेश धस यांनी केला. या संपूर्ण घडामोडी आणि जिल्ह्यातील राजकीय वातावरण पाहता सुरेश धस आणि पंकजा मुंडे एकाच ▶▶पान २ वर

# 'त्या' लाडक्या बहिणींना मोठा झटका!

## ■ १०,५०० रूपये सरकारला परत करावे लागणार?



मुंबई, (वृत्तसेवा) :- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत सरकारने लाभार्थी महिलांची अर्जाची छाननी सूरू केली आहे. या छाननीमध्ये ज्या महिलांनी निकषांना डावलून योजनेचा लाभ घेतला आहे. त्या महिलांना योजनेचे पैसे परत करावे लागणार आहे. यासाठी सरकार महिलांना आवाहन देखील करत आहेत. अशात आता सरकारने या अर्जाच्या छाननी प्रक्रियेला आणखीणच वेग दिला आहे. त्यानुसार आता सरकार अंगणवाडी सेविकांना लाभार्थी महिलांच्या घरोघरी पाठवणार आहे. अंगणवाडी सेविकांच्या या पडताळणती जर महिला निकष डावलून लाभ घेत असल्याचे समोर आले तर त्यांना आतापर्यंत खात्यात आलेले १० हजार ५०० रूपये सरकारला परत करावे लागणार आहे. त्यामुळे लाडक्या बहिणींना मोठा झटका बसला आहे. खरं तर महिला व बाल कल्याण विभागाने लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांच्या अर्जाची छाननी सूरू आहे. या छाननीसाठी आयकर आणि परिवहन विभागाची मदत घेतली जाणार आहे. आयकर विभाग महिलांच्या पैशांचे विवरण सांगणार आहे. तर परिवहन विभाग महिला राहत असलेल्या घरात चारचाकी आहे की नाही? याची माहिती देणार आहे. ▶▶पान २ वर

